लोकमत

# आता भूमिपूजन करणारे सरकारच उद्घाटनही करते : मुख्यमंत्री

(पान १ वरून) महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (महारेल) निर्मित नागपूर जिल्ह्यासह वर्धा, अमरावती, चंद्रपूर, धुळे, जळगाव आणि वाशिम या सात जिल्ह्यांतील सात रेल्वे उड्डाण पुलांचे एकाच वेळी लोकार्पण करताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. रामदासपेठ येथील कृषी महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानावर आयोजित या लोकार्पण सोहळ्याला वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आ. कृष्णा खोपडे, आ. कृपाल तुमाने, आ. किशोर जोरगेवार (चंद्रपूर), आ. श्याम खोडे (वाशिम), महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जयस्वाल उपस्थित होते, तसेच पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल आणि आ. प्रताप अडसळ हे ऑनलाइन सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गेल्या १० वर्षांत राज्यात पायाभूत सुविधांची कामे अभूतपूर्व झाली आहेत. यामुळे नागपूरसह राज्याचा चेहरामोहरा बदलला आहे. सध्या देशात रस्ते, रेल्वे, मेट्रो, उड्डाणपूल आदी पायाभूत सुविधांची जी कामे सुरू आहेत. त्यात सर्वाधिक कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. महारेलने राज्यात उड्डाणपूल बनवण्याचा एक नवीन रेकॉर्ड केला आहे. गतिशीलता काय असते, ते महारेलने दाखवून दिले आहे. पूर्वी १० वर्षांत २ पूल तयार व्हायचे. महारेलने एका वर्षात २५ पूल तयार केले आहेत. महारेलच्या माध्यमातून आणखी २०० पूल व अंडरपासची कामे करायची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. महारेलचे जनरल मॅनेजर जितेंद्र कुमार यांनी आभार मानले.

## एप्रिल २०२५ पर्यंत आणखी २५ रेल्वे उड्डाणपूल व अंडर ब्रीजचे उद्घाटन

- महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार यांनी आपल्या प्रास्ताविकेत सांगितले की, येत्या एप्रिल २०२५ पर्यंत राज्यात आणखी २५ रेल्वे उड्डाणपूल व रेल्वे अंडर ब्रीजचे उद्घाटन करण्यात येईल.
- यासोबतच इतवारी ते नागभीड रेल्वे येत्या एप्रिल २०२५ पर्यंत सुरू होईल. अजनी (नागपूर) येथील केबल स्टेंडच्या पहिल्या लेनचे काम ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण होईल.

## या रेल्वे उड्डाणपुलांचे झाले लोकार्पण

- गोधनी-लोणारा रोडवरील उड्डाणपूल, जि. नागपूर
- सिंधी- कांधळी रोडवरील उड्डाणपूल, हिंगणघाट, जि. वर्धा
- चांदूर ते तळेगाव तशासर रोडवरील उड्डाणपूल, धामनगाव रेल्वे, जि. अमरावती
- बागला चौक ते आंबेडकर चौक उड्डाणपूल, जि. चंद्रपूर
- दोंडाईचा चे चिमठाणा रोडवरील उड्डाणपूल, जि. धुळे
- जळगाव असोदा रोडवरील उड्डाणपूल, जि. जळगाव
- वाशिम आणि केकतुमार रेल्वे स्थानकादरम्यानरोडवरील उड्डाणपूल, जि. वाशिम

लोकमत

# आता भूमिपूजन करणारे सरकारच उद्‌घाटनही करते : मुख्यमंत्री

## महारेलनिर्मित सात रेल्वे उड्डाण पुलांचे एकाचवेळी लोकार्पण



सात रेल्वे उड्डाणपुलांचे रविवारी एकाचवेळी लोकार्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आ. कृष्णा खोपडे, आ. कृपाल तुमाने व महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जयस्वाल.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** पूर्वी एक सरकार एखाद्या प्रकल्पाचे भूमिपूजन करायचे. दुसरे सरकार आले तरी ते काम अर्धवट राहायचे आणि तिसरे सरकार त्या कामाचे लोकार्पण करीत असे; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे 'वर्क कल्चर' बदलवले. आता जे सरकार भूमिपूजन करेल तेच सरकार त्या प्रकल्पाचे उद्घाटन करीत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

- पान ६ वर